महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती–444 602
Email: divsecamt@rediffmail.com
Tel. 0721-2662647, 0721-2662608
Website: sscboardamravati.in

जा. क्रमांक :- अविमं/उमाप/ ६९५
दिनांक :- ३० /०६ /२०२५

प्रति,
प्राचार्य
सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक विदयालय
व कनिष्ठ महाविदयालये
अमरावती विभाग अमरावती.

**विषयः-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. 12 वी) फेब्रुवारी /मार्च 2025 परीक्षेत श्रेणीसुधार (Class Improvement) योजने अंतर्गत प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्याचे विकल्प सादर करणे बाबत.

**संदर्भः-** रा.मं./ परीक्षा –8/4248 दिनांक 25/10/2024

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी ) परीक्षाच्या निकाल जाहीर झाल्यानंतर या विदयार्थ्यांना श्रेणीसुधार योजनेखाली प्रविष्ठ झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका घेताना पूर्वी प्रविष्ठ झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे की नवीन परीक्षेची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे हा विकल्प (विकल्प फॉर्मच्या नमुन्यात ) देण्याचा अधिकार आहे. विदयार्थ्याला संपूर्ण नवीन किंवा संपूर्ण पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारणे बंधनकारक आहे.

निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविदयालयामार्फत एक महिन्या पर्यंत श्रेणीसुधार योजने अंतर्गत उर्त्तीणतेची गुणपत्रिका स्किारण्याबाबत विकल्प अर्ज मंडळाकडे सादर करणे अनिवार्य आहे. निकालापासून एक महिन्याच्या आत विभागीय मंडळाकडे अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. एक महिन्यापर्यत विकल्प अर्ज सादर केल्यास गुणपत्रिका विनाशुल्क देण्यात येईल. व तद्नंतर पाच महिने कालावधीपर्यत प्रतिमाह रू. 500/– या प्रमाणे शुल्क आकारून गुणपत्रिका विदयार्थ्यास घेता येईल.

तेंव्हा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी ) फेब्रुवारी / मार्च 2025 च्या परीक्षेस श्रेणीसुधार योजने अंतर्गत प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्याचे विकल्प अदयाप सादर करण्यात आलेले नाही, अशा विदयार्थ्यांचे विकल्प सादर करण्यात यावे व सुधारित गुणपत्रिका नेण्यात यावी.

(निलिमा टाके)
विभागीय सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती.